# भारतीय जनता पक्ष

## निवडणूक जाहीरनामा २००९

ठळक बिंदू संक्षिप्त स्वरूपात

**गोरगरिबांना प्राधान्य**

१. दरिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबांना, दर महिन्याला ३५ किलो गहू किंवा तांदूळ रु. २ प्रति किलो या दराने मिळणार. स्वस्त धान्य रेशनच्या तसेच खाजगी दुकानांत परतावा करण्यायोग्य कुपनच्या बदल्यात मिळणार.
२. शेतीकरिता कमाल ४% व्याजाने कर्जाची हमी.
३. शेतिकरिता घेतलेल्या कर्जाला माफी.
४. कृषि उत्पन्न विमा योजनेद्वारा किमतीची आणि उत्पन्नाची हमी.
५. पुढील ५ वर्षांत आणखी ३५ दशलक्ष हेक्टर कृषि जमीन सिंचनाखाली आणणार.
६. शहरी गरिबांसाठी विशेष योजना. गरीब व्यापार्यांसाठी ४% व्याजाने कर्ज पुरवठा
७. असंघटित क्षेत्रातील कामगारांना "कामगार बँकांच्या" स्थापनेद्वारे संरक्षण.
८. किमान वेतनाची पुनर्रचना आणि वेतन कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणीची हमी.

**अर्थव्यवस्थेत वाढ, देई भारताच्या समृद्धीला चालना**

१. निर्माण क्षेत्रांत फार मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक गुंतवणुकीद्वारा रोजगार निर्मीतीला चालना. श्री अटलबिहारी वाजपयी यांचे स्वप्न असलेल्या योजनांची आपूर्ती - राष्ट्रीय महामार्ग विकास योजनेद्वारा प्रत्येक दिवशी १५ ते २० किलोमीटर नवीन महामार्गांची निर्मिती; तसेच प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेद्वारा ५०० हून अधिक लोकसंख्या असलेल्या गावांना पक्क्या (बारमाही) रस्त्यांद्वारे जोडणार.
२. नवीन योजनांद्वारा उत्पादन आणि सेवा क्षेत्रांत खाजगी क्षेत्रांतील उद्योगांना चालना. कमी कर आणि कमी व्याज दरांची हमी.
३. आयकर मर्यादा वाढवून वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख करणार. स्त्रिया आणि वरिष्ठ नागरिकांसाठी आयकर मर्यादा वार्षिक उत्पन्न रु. ३.५ लाख. याच्यामुळे ३.५ कोटी लोकांना फायदा होणार.
४. कर्मचारी उद्योजक या दोघांच्या जाचास कारणीभूत ठरलेली 'फ्रींज बेनिफिट टॅक्स' योजना रद्द करणार.
५.कंपन्या तसेच व्यवसायातून उत्पन्न असणा र्यांखेरीज सर्वांना बँकेतील ठेवीतून मिळणा र्याअच्याजावर आकाराल्या जाणार्याे आयकरापासून मुक्ती
६. केंद्रीय विक्री कर रद्द करणार तसेच अबकारी आणि सेवा (जी.एस. टी.) कर मर्यादा १२ ते १४%.
७. नियंत्रक संस्थांवर डोळ्यात तेल घालून लक्ष देणार, जेणेकरून शेअर बाजारात धोकेबाजी करणार्याज कंपन्यांना लगाम बसेल.
८. दरवर्षी गरिबांसाठी १०,००,००० घरांची निर्मिती करून, डबघाईस आलेल्या गृह-निर्माण क्षेत्रास चालना

देणार. गृह कर्जावरील व्याजदर कमी करून, शहरांत घर घेणे आवाक्यात आणणार.
९. परकीय बँकांत साठवलेला भारतीय पैसा निर्धरित करून, तो देशात परत आणण्यासाठी खंबीर पावले उचलणार.
अंदाजे रु. २५ ते रु ७५ लाख कोटी असलेली ही रक्कम जर आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे परत आणल्यास देशभर वीज, रस्त्यांचे जाळे उभारता येईल. सर्व खेड्यामध्ये दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था करता येईल. एवढ्या मोठ्या प्रमाणावर असलेला काळा पैसा जर देशात परत आणला तर प्रत्येक गावाला राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी रु. ४ कोटी पुरवता येतील.
१०. पर्यटन क्षेत्राला चालना: ५० पर्यटन केंद्रे निर्धारित करून तेथे निर्माण (इनफ्रास्ट्रक्चर) आणि दूरसंचार सुविधांनी जोडणार. पुढील ५ वर्षांत भारतात येणार्याकविदेशी पर्यटकांची संख्या दुप्पट करून 'आदरातिथ्य' क्षेत्रातील उद्योगांना रोजगारनिर्मिती करण्यास मदत करणार.
११. भारतीय रिटेल (किरकोळ) व्यापाराला मदत करण्यासाठी या क्षेत्रांत थेट परकीय गुंतवणुकीवर बंदी घालणार.

**देशातील आणि देशा-बाहेरील शत्रूंशी मुकाबला**

१. भारताच्या शत्रूपासून देशाचे संरक्षण करण्याप्रत भाजपाची दृढ निष्ठा सर्वश्रूत आहेच.
देशातील सीमेपलीकडील दहशतवाद्यांविरुद्ध कठोर उपाययोजना करण्याकडे प्राधान्य राहील. 'पोटा' सारखा कायदा सुधारित स्वरूपात आणला जाईल. गुप्तचर यंत्रणांची पुनर्रचना केली जाईल. आरमारी सुरक्षेद्वारे देशाची ४००० किमी लांबीची किनारपट्टी संपूर्णतः संरक्षित केली जाईल.
२. देशातील दहशतवादाच्या वाढीस मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरलेल्या परकीय घुसखोरांना पद्धतशीरपणे ओळखले जाईल त्यांना पकडून त्यांची हकालपट्टी करण्यात येईल. युपीए सरकारने एक गठ्ठा मतांच्या राजकारणापायी जाणीवपूर्वक दुर्लक्षित केलेली भारत - बांगलादेश सीमा लवकरात-लवकर कुंपण बांधून संरक्षित करण्यात येईल.
३. जरब तंत्राच्या कूट-नीतीचा वापर करून, सीमेपालीकडून दहशतवादाची निर्यात करणार्या राष्ट्रांना एकटे पाडून त्यांच्यावर दुःसाहस न करण्याचा दबाव टाकण्यात येईल. परकीय फुटिरता वादी गटांचा (झरा) शिरकाव कायमचा बंद केला जाईल.
४. देशभरातील माओवाद्यांविरुद्ध निरंतर युद्ध पुकारण्यात येऊन त्यात अत्यंत यशस्वी व लोकप्रिय ठरलेल्या छत्तिसगढ मॉडेलचा वापर करण्यात येईल.
५. प्रत्येक भारतीयास एक सर्व समावेशक राष्ट्रीय ओळखपत्र देण्यात येईल.

**जयजवान - कृतीमध्येही**

१. लष्करी निम-लष्करी दलांतील सर्व सदस्यांना आयकर माफी देण्यात येईल. याचा लाभ सुमारे २० लाक लोकांना होईल.
२. संरक्षण दलासाठी वेगळा वेतन आयोग उभारण्याच्या दृष्टीने पाऊले उचलण्यात येतील.
३. एक रँक - एक पेन्शनची अंमलबजावणी करण्यात येईल. चांगल्या वेतनासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या

वेतन रचनेचा पुनराढावा करण्यात येईल.

४. निवृत्त सैनिकांच्या पुनर्वसनासाठी चांगल्या योजना आखण्यासाठी तसेच त्यांच्यासाठी सुयोग्य रोजगार संधी उपलब्ध करून त्यांचे चांगल्या रीतीने पुनर्वसन करण्यासाठी राज्य सरकारांकडे पाठपुरावा करण्यात येईल.

**उर्जेची बचत, उर्जेची निर्मिती**

१. पुढील ५ वर्षांत, हाती घेतलेल्या योजनांची जलद गतीने पूर्तता करून तसेच नवीन योजना सुरू करून आणखी १२५००० मेगावॅट विजेची निर्मिती. यातील २०% अपारंपरिक उर्जा स्त्रोतंपासून.
२. रिन्यूअबल (नूतनिकृत) उर्जा तंत्रच्या जसे की नदी-प्रवाहावर चालणार्यार, सौर, वायू बायो-मास उर्जा प्रकल्पाद्वारे फोसिल इंधानावरील अवलंबित्व कमी करणार.
३. आक्रमक कुटनीती आणि व्यवसायिक मुस्सद्दिगिरि द्वारे उर्जा (गरजांची) सुरक्षा.

**महिलांच्या सबलीकारणाद्वारे भारताचे सशक्तिकरण**

१. मध्यप्रदेश सरकारच्या अत्यंत यशस्वी ठरलेल्या 'लाडली लक्ष्मी' योजनेची संपूर्ण देशभर अंमलबजावणी करून त्याद्वारे शाळेत जाणार्याामुलींना शिक्षणासाठी तसेच तरुणींना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होण्यास मदत. प्रत्येक मुलीला १२ वी उत्तीर्ण होताच रु. ११८००० मिळणार.
२. पूर्वाश्रमीच्या भाजपशासित राजस्थान सरकारच्या भामाशाह योजनेसाठी मार्ग मोकळा करण्यात येईल ज्याद्वारे प्रत्येक प्रौढ स्त्रीच्या नावे एक बँक खाते उघडून त्यात रु १५०० जमा करण्यात येतील. हे खाते बोटांचे ठसे ओळखणार्यार बायो-मीट्रिककार्डाद्वारे वापरता येईल.
३. भारतातील गरिबी रेषेखालील प्रत्येक शाळकरी मुलीला एक सायकल पुरवण्यात येईल.
४. ग्रामीण महिलांमध्ये उद्योजाकतेचा पुरस्कार करण्यासाठी महिला बचत गटांसाठी नवीन योजना सुरू करण्यात येतील.
५. विधिमंडळात महिलांना ३३% आरक्षण देण्याप्रती भाजप वचनबद्ध असून ते लवकरात लवकर लागू करण्यासाठी विशेष प्रयत्न करेल.
६. २८ लाख आंगणवाडी कर्मचार्यांचे तसेच मदतनिसांचे, जे एकात्म बाल विकास योजनांचे आधारस्तंभ आहेत,वेतन दुप्पट करण्यात येईल.
७.भाजपाचा असा विश्वास आहे की जोपर्यंत घटनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार आणि सर्वोच्च न्यायालयाच्या वारंवार निर्देशांनुसार समान नागरी कायद्याची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत भारतातील सर्व स्तरांतील महिलांचे सशक्तिकरण होणार नाही. समाजातील विविध मतं असलेल्या सर्व घटकांशी चर्चा करून असा कायदा लागू करण्याप्रत भाजपा वचनबद्ध आहे.

**भारतीय तरुण, देशाचे आधार स्तंभ**

१. देशाच्या लोकसंख्येच्या ५०% असलेल्या तरुणांमध्ये यु.पी.ए. सरकारने दुःख , नैराश्य आणि बेकारी निर्माण केली आहे. भाजपा ग्रामीण आणि शहरी भागात फार मोठ्या प्रमाणावर व्यवसाय मार्गदर्शन आणि रोजगारनिर्मिती योजना हाती घेऊन तरुणांच्यात नवी उमेद निर्माण करेल.
२.देशातील तरुणांचे विविध क्षेत्रांतील गुण आणि कौशल्य ओळखून त्यात नैपुण्य आणण्यासाठी संपूर्ण देशभरात राष्ट्रीय ज्ञान संवर्धन (इंक्युबेशन) केंद्रांची स्थापना करण्यात येईल.
३.शैक्षणिक कर्जावरील व्याजमार्यादा 4% करण्यात येऊन ती सहजतेने उपलब्ध करण्यात येतील.
४. भाजपा ग्रामीण भागांत माहिती तंत्रज्ञानावर आधारित 1.2 कोटी नवीन रोजगार निर्मिती करेल. कंप्यूटरच्या किंमती मोठ्या प्रमाणावर कमी करून सर्व घटकांना परवडण्याजोग्या केल्या जातील. पुढील पाच वर्षांत सर्व शैक्षणिक संस्थांना इंटरनेट सुविधा पुरवली जाईल. सर्व गावे ब्रॉडबँडद्वारे जोडण्यात येतील.
५. अनुसूचित जाती आणि जमाती आणि अन्य मागासावर्गीय आणि समाजातील अन्य उपेक्षित तरुणांत कला नैपुण्य आणण्यासाठी विशेष व्यवस्था केली जाईल आणि त्यांच्या इंटरनेटद्वारे शिक्षणावर भर देण्यात येईल.
६.खेळांच्या क्षेत्रांत तरुणांचे कौशल्य हुडकून ते वाढवण्यासाठी आक्रमकतेने नवीन योजना राबविल्या जातील. या साठी खासकरून शैक्षणिक संस्थात खेळांस योग्य अशा आधारभूत सुविधांच्या निर्मितीसाठी रु. ५००० कोटी उपलब्ध करून दिले जातील. तद्न्य मार्गदर्शकांची नेमणूक केली जाईल; आंतरराष्ट्रीय पदक विजेत्यांसाठी नोकरी राखून ठेवली जाईल. सर्व शाळांच्या अभ्यासक्रमात खेळ हा विषय सक्तीचा केला जाईल.

**लोकांचे आरोग्य, देशाची संपत्ती**

१. भाजपा वचनबद्ध आहे की शुद्ध पाणी उपलब्ध असणे हा (नागरिकांचा) मूलभूत अधिकार असेल. देशातील सर्व नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपाययोजना हाती घेण्यात येतील.
२. खाजगी रुग्णालये आणि सुश्रूषा केंद्रांमधिल अयोग्य व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासाठी एका नियंत्रक आयोगाची निर्मिती करण्यात येईल.
३. साल २०१४ पर्यंत सर्वांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करण्यासाठी सर्वसमावेशक योजना हाती घेण्यात येईल.
४. संपूर्ण देशभरात '१०८ क्रमांक फिरवाताच घारपोच रुग्णवाहिका' सेवा पुरवण्याची सक्ती करण्यात येईल.
५. रालोआ सरकारने देशात ६ ठिकाणी एम्स (रुग्णालये) सुरू करण्याची योजना हाती घेतली होती ती यु.पी.ए. सरकारने दुर्लक्षिली. पुढील ५ वर्षांत या ६ ठिकाणी अत्याधुनिक रुग्णालये जलदगतीने बांधण्यात येतील.
६. बाळ बाळंतिणिंसाठी असलेली 'जननी सुरक्षा योजना' अधिक मजबूत करण्यात येईल.
७. आयुर्वेद, योग आणि युनानी इत्यादी पर्यायी औषध सेवांच्या प्रसारासाठी गुंतवणूक करण्यात येईल.
८. लोकसंख्या नियंत्रण ही भारताच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. भाजपा विविध समाजघटकांशी चर्चा करून या दिशेने झपाट्याने प्रगती करण्यासाठी नवीन योजना सुरू करण्यात येईल. .

**उपेक्षितांना विशेषाधिकार**

१. सर्वांना समान संधी तसेच न्याय या आपल्या श्रद्धेबद्दल भाजपा वचनबद्ध आहे. भाजपा शासित राज्य

सरकारांनी समाजातील अनुसूचित जाती आणि जमाती आणि अल्पसंख्यंकांसाठी खास करून शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन, दारिद्र्य निर्मूलन आणि उद्योजकता विकास या क्षेत्रांत अनेक योजना हाती घेतल्या आहेत. यांपैकी सर्वाधिक यशस्वी योजना सुधारित स्वरूपात संपूर्ण देशभरात राबविण्यात येतील. याशिवाय ईशान्य भारतासारख्या अप्रगत भागातील लोकांसाठी दुर्गम जंगले आणि डोंगराळ भागांत राहणार्यालोकांच्या विकासाला प्राधान्य देण्यात येईल.

२. अनुसूचित जाती आणि जमाती आणि अन्य मागासवर्गीयांचे शिक्षण आणि नोकरीतील आरक्षण कायम ठेवतानाच समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास अन्य घटकांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात येईल.

**ज्येष्ठ नागरिक**

१. ज्येष्ठ नागरिकांचे राष्ट्र उभारणीतील तसेच समाजात नागरी मूल्ये रुजवण्यात असलेले महत्वाचे योगदान लक्षात घेता त्यांच्यासाठी प्रवासातील सवलती साठी वायोमर्यादा ६५ वरुन ६० वर्षांवर आणणे, कर्जावरील व्याजदर कमी करण्याची शक्यता पडताळणे, भेदभावरहित विमा योजना लागू करणे इत्यादी गोष्टींसाठी भाजपा वचनबद्ध आहे.

२. वरीष्ठ नागरिकांची पेन्शन संपुर्णतः करमुक्त करण्यात येईल.

**सुयोग्य पर्यावरणासाठी**

१. प्रदूषणरहित तंत्रज्ञानाद्वारे पर्यावरणातील बदल आणि ग्लोबल वार्मिंगशी लढण्याप्रत वचनबद्धता.

२. उत्तर भारतातील प्रमुख नद्यांचे उगमस्थान असलेल्या हिमालयातील हिमनद्यांच्या (वेगाने) वितळण्यावर अंकुश बसवण्यासाठी योजना हाती घेण्यावर भर.

३. वनांना संरक्षण आणि वनीकरणाचा पुरस्कार.

४. भारताचा राष्ट्रीय पशु वाघाच्या संवर्धनासाठी सर्व शक्य उपाय-योजना तसेच सर्व वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक वस्तिस्थानांच्या संरक्षणासाठी योग्य उपाय-योजना करणार. भारताची बहुरंगी पण धोक्यात आलेल्या जैविक विविधतेच्या संरक्षणावर भर.

**संस्कृतीच्या रक्षणासाठी**

१. अयोध्येत भव्य राम-मंदिराच्या उभारणी करिता भाजप कटिबद्ध आहे.

२. भाजपा कोणालाही पवित्र राम सेतुला हात देखील लावू देणार नाही. आम्ही सेतु-समुद्रम प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 'राम सेतुला' इजा न पोहोचवता दुसरा मार्ग सुचवू.

३. पवित्र नदी गंगा तसेच अन्य महत्वाच्या नद्यांच्या शुद्धिकरणाला प्राधान्य देण्यात येईल. या (भगीरथ प्रयत्नांत) विशाल परियोजनेत स्थानिक लोकसमुहांची मदत घेण्यात येईल.

४. भाजपाची गो-रक्षेवर नितांत श्रद्धा आहे. त्यासाठी निरंतर पाठपुरावा केला जाईल.

५. जो पर्यंत संविधानात कलम ३७० अस्तित्वात आहे तोपर्यंत देशाची संपूर्ण एकात्मता अशक्य आहे. भाजपाचा दृढ विश्वास आहे की देशाच्या एकात्मते करिता ही तरतूद (कलम) दूर करावीच लागेल.